# कळी

तुझ्याकडच्या पावसाने
वातावरण झालंय बेधुंद
कळत नाही मला, माझ्याकडे
कुठून आला हा मृद्‌गंध

शब्द नको, स्पर्श नको
नकोच काही चिरंतन
एकचं तेवढे माझे असू दे
चिंब भिजलेले मन

नको पाठवू भेट कळ्यांची
उगीच मन गलबलते
पाहुनी त्यांना पुन्हा आठवे
अपुले न उमललेले नाते

--------------संध्या रानडे